Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal   Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# वसंतराव चव्हाण यांची राजकीय जडणघडण: एक अभ्यास

**संशोधक**
**साईनाथ मनोहर गायकवाड**

**मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. संगीता संदीप शिंदे**
प्रोफेसर, इतिहास विभाग
यशवंत महाविद्यालय, नांदेड
ता.नांदेड जि.नांदेड.

**प्रस्तावना**

लोकशाही प्रक्रियेमध्ये नेता, अनुयायी व जनता या तीन बाबी महत्त्वाच्या असतात. नेता आणि जनता यांच्यामधील नातेसंबंधी स्वाभाविक अंतर असते, कारण, शिक्षण, अनुभव, विचार आणि चिंतन यातून नेत्याची विचारधारा प्रगल्भ झालेली असते. राजकीय नेते त्यांच्या योगदानातून जनतेच्या विचारात व प्रवृत्तीत बदल घडविण्याचे महत्त्वपूर्ण काम करतात. यातून राजकीय विकास आकार घेत असतो. हे अंतर भरून काढण्यात नेत्याला जे यश येते त्यावर नेत्याच्या योगदानाचे मोजमाप अवलंबून असते. अशा नेतृत्वामध्ये पंडित जवाहरलाल नेहरू, लाल बहादूर शास्त्री, वल्लभभाई पटेल, मोरारजी देसाई, इंदिरा गांधी, व्ही.पी. सिंह, अॅटलबिहारी वाजपेयी, प्रमोद महाजन यांचे राष्ट्रीय पातळीवर योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. तर महाराष्ट्राचा विचार करता यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार, शंकरराव चव्हाण, वसंतराव नाईक, सुधाकर नाईक, विलासराव देशमुख, गोपीनाथराव मुंडे, आर. आर. पाटील इत्यादी नेतृत्वाने महाराष्ट्राच्या राजकारणात बहुमोल कार्य केले आहे. त्यांचे विचार किंवा कार्य येणाऱ्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दीपस्तंभाप्रमाणे मार्ग दाखवितील यात तीळ मात्र शंका नाही. अशाच राजकीय नेतृत्वाच्या पटड्डीतील वसंतराव चव्हाण यांचे सुद्धा नाव आग्रहाने घेतले जाते. कारण वसंतराव चव्हाण यांनी सरपंच, जिल्हा परिषद सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती, नांदेड जिल्हा बँकेचे अध्यक्ष, विधानपरिषद सदस्य, दोन वेळेस विधानसभा सदस्य आणि नांदेड जिल्ह्याचे खासदार इत्यादी पदावर विराजमान झाले होते. त्यामुळे या ठिकाणी वसंतराव चव्हाण यांच्या जडणघडणीचा अभ्यास खालील विविध मुद्यांच्या आधारे करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती**

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. जसे की, विश्लेषणात्मक, ऐतिहासिक, वर्णनात्मक इत्यादींचा उल्लेख करता येईल. यापैकी प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. वसंतराव चव्हण यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
२. वसंतराव चव्हाण यांच्या जडणघडणीचा अभ्यास करणे.
३. शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे.
४. साहित्य क्षेत्रातील कार्याचा अभ्यास करणे.

**कौटुंबिक पार्श्वभूमी**

नायगाव तालुका म्हटला की, चव्हाण कुटुंबांकडे सर्वांचे लक्ष जाते. कारण चव्हाण कुटुंबाने संयुक्त कुटुंब पद्धतीचे जतन केले आहे. आजही नांदेड जिल्ह्यात सर्वात मोठे कुटुंब म्हणून नायगावच्या चव्हाण कुटुंबाकडे पाहिले जाते. चव्हाण कुटुंब हे मूळात शेतकरी होते. परंपरागत चालत आलेल्या शेतीव्यवसाय ते प्रामाणिकपणे करीत होते. मराठवाड्याच्या स्वतंत्रोत्तर चळवळीत वसंतराव चव्हाण यांचे आजोबा अमृतराव चव्हाण यांनी भूमिगत राहून सहकार्य केले. मराठवाडा निजामाझ्याच्या वर्चस्वापासून मुक्त झाल्यानंतर अमृतराव यांना स्वातंत्र्यसैनानी म्हणून गौरविले गेले. अशाच स्वतंत्र्यसैनानी कुटुंबात बळवंतराव चव्हाण यांचा जन्म झाला. बळवंतराव चव्हाण वसंतराव चव्हाण यांचे वडील नायगाव मतदार संघाचे आमदार होते. त्यांनी जनतेच्या समस्या समजून घेत त्या सोडवण्यासाठी तळमळीने काम केले. त्यांचे व्यक्तिमत्त्व हे अभ्यासू, संयमी आणि जनहितासाठी झगडणारे असे होते. त्यामुळे त्यांचे नाव केवळ नायगाव पंचक्रोशीपुरते मर्यादित न राहता संपूर्ण नांदेड जिल्ह्यात आदराने घेतले जाते. अशा भक्कम राजकीय व सामाजिक वारसा वसंतराव चव्हाण यांना लाभलेला दिसून येतो. स्व. अमृतराव चव्हाण व स्व. बळवंतराव चव्हाण यांच्यासारख्या दूरदृष्टी असलेल्या राजकीय व्यक्तिमत्त्वांचा प्रभाव वसंतराव चव्हाण यांच्यावर पडलेला दिसून येतो. एकंदरीत वसंतराव चव्हाण यांना सामाजिक दर्जा आणि राजकीय वारसा मिळाला आहे. यावरून वसंतरावांची आर्थिक परिस्थिती सदन स्वरूपाची होती.

**जन्म**

१५ ऑगस्ट १९५४ रोजी नायगाव तालुक्यातील प्रसिद्ध अशा कुटुंबात वसंतरावांचा जन्म झाला. बळवंतरावांना वसंतराव, केशव, हणुमंत, सुधाकर आणि शिवाजी अशी पाच मुले तर सुमिता, ललिता आणि सविता या तीन मुली आहेत. वसंतराव हे कुटुंबात सर्वात मोठे होते.

**शिक्षण**

जि. प. प्रा. शाळा नायगाव येथेच पहिली ते चौथीपर्यंतचे वसंतरावांचे शिक्षण झाले. पाचवीसाठी त्यांनी जनता हायस्कूल नायगाव येथे प्रवेश घेतला. जनता हायस्कूलमधून १९७१ मध्ये मॅट्रिक उतीर्ण झाले. त्यावेळी भगवान अंजनीकर, माधवआप्पा बेळगे, वसंतराव मोडेवार, चंद्रकांत कवटीकवार, सुरेश पांपटवार, माधव तमलुरे, शंकर वनशेट्टे हे वर्ग मित्र होते. मॅट्रिक नंतर पुढील बी.कॉम द्वितीय पर्यंतचे शिक्षण पीपल्स कॉलेज येथे चालू असतानाच घराकडील काही अडचणीमुळे शिक्षण अर्ध्यावर सोडून नायगावला रवाना झाले. म्हणजेच घरामध्ये वसंतराव मोठे असल्यामुळे घरच्या कामाची जबाबदारी सांभाळण्यासाठी त्यांना शिक्षण सोडून द्यावे लागले.

**विवाह**

वसंतरावांचे पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मुखेड तालुक्यातील कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते माधवराव पाटील बेटमोगरेकर यांची कन्या सुंदरताई बेटकबिलोली येथील आत्यांकडे लहानपणापासून राहत होत्या. मारुती पाटील यांना मूलबाळ नव्हते. त्यामुळे त्यांचा सुंदरताईवर खूप जीव होता. प्राथमिक शिक्षण बेटकबिलोली येथे पार पडल्यानंतर सुंदरताई जनता हायस्कूलमध्ये शिकायला आल्या. त्यामुळे वसंतराव व सुंदरताई दोघेही एकमेकांना ओळखीत होते. त्यामुळे २१ मार्च १९७६ रोजी वसंतराव च सुंदरताई यांचा विवाह झाला. लग्न झाल्यानंतर वसंतरावांनी काही दिवस स्वस्त धान्य दुकान चालवले, नंतर कृषी बियाणे व औषधी विक्री केंद्र चालविले.

**सरपंच**

पदवीचे शिक्षण अर्ध्यावर सोडून नायगावला आल्यानंतर वसंतरावांनी कृषी बियाणे व औषधी विक्री दुकान सुरू केले होते. परंतु १९८० मध्ये ग्रामपंचायतीची निवडणूक लागल्यामुळे दुकान बंद करून वसंतराव निवडणुकीला उभे राहिले. पहिल्याच प्रयत्नात सदस्य म्हणून निवडूण आले. १७ सदस्यांच्या ग्रामपंचायतीमधून १४ मते वसंतरावांनी घेऊन प्रस्थापिताना धक्का देत ते पहिल्यांदाच सरपंच झाले. पुढे वसंतराव १९७८ ते २००२ पर्यंत म्हणजेच सातत्याने २४ वर्षे सरपंच पदावर कार्यरत होते. त्यानी काही काळ बिलोली सरपंच संघटनेचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. सन १९७८ ते २००२ या काळात नायगाव ग्रामपंचायतमध्ये कच्चे रस्ते, आरोग्य, विद्युतपुरवठा, नळयोजना, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सुविधा इत्यादी क्षेत्रांत अपुऱ्या निधीतून त्यांनी विकासयोजना राबविल्या.[८] याच काळात तळागाळातील शेतकरी, शेतमजूर, उपेक्षित, दीनदलित या 'नाहीरे' वर्गाचा त्यांचा जवळून संबंध आला. समाजकारणावर आधारित राजकारणाचे धडे त्यांनी येथेच गिरविले. धर्मनिरपेक्षतेच्या मजबूत मंचावर ते इथेच उभे राहिले. इथूनच त्यांच्या कर्तृत्वाचा आलेख उत्तरोत्तर वृद्धिंगत होत राहिला. सरपंच, जि.प. सदस्य, स्वारातीम विद्यापीठात सिनेट सदस्य, विधान परिषद सदस्य, विधानसभा सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन आणि पुढे लोकसभा सदस्य हा त्यांच्या कर्तृत्वाचा देदीप्यमान प्रवास झाला. साहित्य, कला, क्रीडा आणि समतेच्या राजनीतीचा वडिलांकडून मिळालेला वारसा वसंतरावांनी वृद्धिंगत केला होता. अनेक वर्षे यशस्वी राजकारण केलेले बळवंतरावजी चव्हाण एक कलासक्त राजकारणी होते. या त्यांच्या गुणांचाप्रभाव वसंतराव यांच्यावर पडला.

**जिल्हा परिषद सदस्य-१९९०-२००२**

पहिल्याच प्रयत्नात वसंतराव विक्रमी मतांनी नायगाव गणातून निवडूण आले. सन १९९० ते १९९५ आणि सन २००२ साली वसंतराव यांनी नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत नायगाव गटाचे सदस्य म्हणून विशेष कार्य केले. जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्याअंतर्गत नायगाव ट्रॉमाकेअर सेंटरची उभारणी, कोलंबी येथील उपसा जलसिंचन योजना, गंगनबीड-घुंगराळा निसर्गपर्यटन केंद्रास मान्यता, नायगाव-उमरा येथील आय.टी.आय. इमारतीचे बांधकाम, धर्माबाद येथे पशुवैद्यकीय दवाखान्याची उभारणी व धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा मिळवून देणे, धर्माबाद कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत विकास निधी मिळवून देणे, नायगाव-उमरी-धर्माबाद येथे क्रीडा संकुलाची उभारणी[९] इत्यादी विकासकामे त्यांच्या भगीरथ प्रयत्नांतून झाली.

**नायगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती**

वसंतराव चव्हाण हे जिल्हा परिषद सदस्य झाल्यानंतर त्यांच्या कार्याचा विस्तार होण्यास मदत झाली. त्यांच्या कार्याची हातोटी पाहून त्यांची नायगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती म्हणून निवड झाली. यावेळी वसंतरावांनी खालील कामे पार पाडली.

१. बाजारांच्या कार्यक्षेत्रात विकासासाठी बाजार समित्यांनी हाती घेतलेल्या कार्यक्रमात समन्वय घडवून आणला.
२. कृषि उत्पन्न बाजारांच्या विकासासाठी राज्यस्तरीय नियोजनाचे काम केले.

३. कृषि विषयक पणनाच्या संबंधातील विषयांबाबत चर्चासत्रे, कार्यसत्रे व प्रदर्शने आयोजित करण्याला प्राधान्य दिले.

४. बाजार समितीने हाती घेतलेल्या बांधकाम कार्यक्रमासंबंधातील आराखडे व अंदाजपत्रक तयार करण्याच्या तिच्या कामांवर पर्यवेक्षण करणे आणि त्याबाबत तिला वेळोवेळी मार्गदर्शन करण्याचे कार्य केले.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य**

विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रातील उच्च शिक्षण देणारे महाविद्यालयाच्या विद्यार्थी केंद्रीत काही अडचणी सोडविण्यासाठी संस्थाचालकाकडून विद्यापीठावर सदस्य निवडले जातात. अशाच पद्धतीने वसंतराव चव्हाण यांची पाच वर्षासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट सदस्य म्हणून निवड झाली होती. यावेळी वसंतराव चव्हाण यांनी विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्वच उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयाचे प्रश्न व अडचणी सिनेट सभागृहात मांडून त्या सोडवणूक करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चेअरमन-२०२१-२०२३**

वसंतराव चव्हाण यांची २०२१ ते २०२३ मध्ये नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमन पदी निवड झाली. वसंतराव चव्हाण यांनी कामाची अंमलबजावणी करीत असताना बँकेच्या प्रगतीसाठी कोणताही निर्णय घेण्यासाठी आडकाठी आणली नाही तर प्रगतीसाठी सकारात्मक प्रतिसाद दिला. वयाने ज्येष्ठ असूनदेखील त्यांच्यासोबत काम करत असताना कधी त्यांनी यासंदर्भातील जाणीव प्रशासकीय पातळीवर काम करत असताना होऊ दिली नाही. वसंतराव चव्हाण यांनी अध्यक्षपद स्वीकारले तेव्हा बँकेचे भागभाडवल रु.६२.१४ कोटी, पीककर्ज वाटप रु.२८२ कोटी, संचित तोटा १.१११.६२ कोटी, ढोबळ अनुत्पादित कर्जाची रक्कम रु.१९५.०३ कोटी व अनुत्पादित कर्जाचे एकूण प्रमाण २९.६३६ एवढे होते. अशा परिस्थितीमध्ये त्यांनी अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर बँकेचे शताब्दी वर्ष उंबरठ्यावर आले होते. म्हणजे, बँकेच्या स्थापनेपासून बँकेच्या ९८ व्या वर्षी त्यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली आणि त्यावेळेसच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा करून शताब्दी वर्षांमध्ये बँकेची आर्थिक परिस्थिती चांगली यासाठी काठकसर केली. बँकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्या लागतील. यासंदर्भात कृती आराखडा तयार करून मा. संचालक मंडळांच्या मान्यतेने त्यावर अंमलबजावणी सुरू करण्यात आली. 'सहज खेळकर साधे वर्तन। यातच मोठ्याचे मोठेपण॥' या उक्तीप्रमाणे वसंतरावजी चव्हाण यांनी वयाने, अनुभवाने, पदाने मोठे / ज्येष्ठ असतानादेखील सर्वांना अतिशय प्रेमाने वागवत असत आणि त्यामुळे बँकेच्या शताब्दी वर्षामध्ये बँकेच्या आर्थिक परिस्थितीमध्ये आमूलाग्र बदल होऊन बँकेचे भागभांडवल रु.६८.२३ कोटी झाले. पीककर्ज वाटप रु.४०१.८५ कोटी करण्यात आले, संचित तोटा रु.६२.४५ कोटीवर आला, ढोबळ अनुत्पादित कर्ज रु.१३४.९३ कोटी शिल्लक राहिले. ज्याचे एकूण कर्जाशी प्रमाण १८.१५% एवढे कमी झाले. यावरून त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळामध्ये भागभांडवलामध्ये रु.५.२९ कोटीने वाढ झाली, पीककर्ज वाटपामध्ये रु.११९.८६ कोटीने वाढ झाली. ढोबळ अनुत्पादित कर्जामध्ये रु.६०.१० कोटींनी घट होऊन अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ११.४८% ने कमी झाले तर संचित तोटा रु.४९.१७ कोटी रुपयांनी कमी झाला. बँकेच्या आर्थिक परिस्थितीमध्ये लक्षणीय प्रगती करणे केवळ त्यांच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे व

प्रशासनाच्या पाठीमागे खंबीररित्या उभे राहिल्यामुळे शक्य झाले. विशेष म्हणजे बँकेच्या इतिहासामध्ये संस्मरणीय अशा शताब्दी वर्षाच्या इतिहासाचे ते मानकरी ठरले.

बँकेच्या शतकपूर्ती सोहळयाचे औचित्य साधून बँकेस नाबार्डच्या अर्थसाहाय्यातुन प्राप्त ग्रामीण व दुर्गम भागातील जनतेला डिजिटल माध्यमातून त्यांच्यादारी सुविधा मिळावी म्हणून मंजूर करण्यात आलेल्या दोन ए.टी.एम. व्हॅनचा लोकार्पण सोहळादेखील त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात संपन्न झाला. त्यामुळे जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातील व दुर्गम भागातील जनतेस याचा लाभ होत आहे. यासोबतच बँकेच्या मुख्य कार्यालयातील इमारतीमध्ये ए.टी.एम. सेंटर व बँकेकडून ग्राहकांना सोनेतारण योजनादेखील त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात कार्यान्वित करण्यात आल्या. ज्यामध्ये विशेष करून शेतकऱ्यांना नियमित व्याजामध्ये २% सुट देण्यात आली. तर भविष्यामध्ये सर्व तालुकास्तरावर बँकेचे स्वतःचे ए.टी.एम सेंटर लवकरच जिल्ह्यातील जनतेसाठी कार्यान्वित करण्यात येणार असल्याचा निर्णयदेखील घेण्यात आला. एकंदरीत वसंतराव चव्हाण यांनी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमन पद स्वीकारल्यानंतर बँकेला आलेली मरगळ दूर करून पुन्हा एकदा बँकेला जिल्ह्यात चांगले दिवस आणल्याचे दिसून येते.

**शैक्षणिक संस्थाची उभारणी**

वसंतराव यांचे वडील कै. बळवंतरावजी चव्हाण यांना शिक्षणाची जान असल्यामुळे त्यांनी नायगाव येथे जनता हायस्कूलची स्थापना केली. यातून अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन देशाच्या विविध भागात रूजू झाले. याच संस्थेचे सचिव पद व पुढे अध्यक्षपदाची जबाबदारी वसंतराव यांच्यावर आल्यानंतर त्यांनी शैक्षणिक संस्थेचा केलेला विस्तार नेत्रदीपक आहे. पुढे वसंतरावांनी जनता एज्युकेशन सोसायटी नायगाव या संस्थेमार्फत, प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण देणारे शरदचंद्र महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, अन्न व तंत्र महाविद्यालय, आय.टी.आय, अध्यापक विद्यालय, य.च.मु. विद्यापीठाचे केंद्र असे २० शैक्षणिक संस्थांद्वारे विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणारे, युवकांना आत्मनिर्भर बनविण्याचे कार्य त्यांनी केले. एकंदरीत वसंतराव चव्हाणांनी शैक्षणिक संस्था तर उभारल्याच; पण त्याचबरोबर साहित्यिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक क्षेत्राला नव्या दिशा प्राप्त करून दिल्या.

**साहित्याची जोपासना**

१९९२ रोजी विभागीय बालकुमार साहित्यसंमेलन घेतल्यानंतर बरोबर दोन दशकांनी म्हणजेच २००८ मध्ये मराठवाडा साहित्यसंमेलनाचे आयोजन नायगावला केले. साहित्य हा समाजाचा आरसा असतो आणि त्या आरशात राजकारण्यांनी कधी कधी डोकावून पाहिले पाहिजे असे म्हणणारे वसंतराव हे किती परिपक्क आणि बहुश्रुत आहेत. याचा प्रत्यय मराठवाडा साहित्यसंमेलनाच्या निमित्ताने आला. खरे तर त्यांना नायगावला अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलन घ्यायचे होते. तशी इच्छाही त्यांनी व्यक्त केली होती. त्यासंदर्भाने मराठवाडा साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्यामार्फत साहित्य महामंडळाकडे तसा प्रस्तावही दिला होता. परंतु अखिल भारतीय साहित्य संमेलनाऐवजी मराठवाडा साहित्यसंमेलन घ्यावे असा सल्ला ठाले पाटील यांनी दिला. त्यानुसार नोव्हेंबर २००८ मध्ये नायगाव येथील जनता हायस्कूलच्या पटांगणात मा. वसंतराव चव्हाण यांच्या पुढाकाराने मराठवाडा साहित्यसंमेलनाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. प्राचार्य गजमल माळी हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ नेते मा. शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते करण्यात येणार

होते. हे संमेलनाचे वेगळे आकर्षक होते. जनता हायस्कूलचे पटांगण रसिक श्रोत्यांनी भरून गेले होते, परंतु मुंबईत अचानक उद्भवलेल्या परिस्थितीमुळे पवार साहेबांऐवजी मा. जयंत पाटील आले. वसंतराव चव्हाण यांनी साहित्याची जोपासणा होण्याबरोबर ग्रामीण भागात साहित्य रूजले पाहिजे याच उद्देशाने नायगावच्या नगरीत मराठवाडा साहित्य संमेलन घेऊन साहित्याला चालना देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले.

**नायगावचा विकास**

सन २००९ ते २०१६ काळात नायगाव नगरपंचायतीच्या कार्यक्षेत्रात वसंतराव चव्हाण यांनी विकास कामाला प्राधान्य देताना महत्त्वपूर्ण संस्थाची उभारणी केली. यामध्ये नायगाव शहरात न्यायालय इमारत बांधकाम (१ कोटी ६३ लाख), तहसील कार्यालय इमारत (निधी ८९ लाख रु.), तहसील अंतर्गत नावीन्यपूर्ण योजनांसाठी ६ लाख रु. निधी, नायगाव ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम (निधी ६३ लाख), आय. टी. आय. प्रशिक्षण कार्यशाळा उभारणी (निधी ६ कोटी), नायगाव उपकोषागार कार्यालय संगणक / प्रिंटरसाठी रु.७२००० / निधी, नायगाव दुय्यम निबंधक कार्यालय इमारत निधी रु.७७०००/- नायगाव परिसरातील गावांसाठी पाणीपुरवठा निधी रु.१३ कोटी, नायगाव येथील पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी रु. २ कोटी निधी त्यानी आमदार या नात्याने मिळविला.

नायगाव नगरपंचायत अंतर्गत सर्व वॉर्डातून अर्थात गल्लीतून स्थानिक विकास निधी रुपये ६५ कोटी मंजूर झाला आहे. ज्यामुळे नायगाव शहरातील रस्ता उभारणी, नळ योजना, नाली बांधकाम, भाजीपाला बाजार आणि नऊ वाड्यांसाठी इतर विकास योजनांद्वारे सर्वकष विकास घडवून आणण्यात त्यांचा मोलाचा वाटा लाभला. सन २००९ ते २०१४ पर्यंत व २०१४ ते २०१९ या दोन टर्ममध्ये आमदार म्हणून वसतराव चव्हाण यांनी केलेली कामे मतदारसंघातील रस्ते, नाली, समाजमंदिर, विंधन विहीर, हातपंप, सांस्कृतिक सभागृह, नाबार्डअंतर्गत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत राज्य रस्ता क्रमांक २५२ च्या उभारणीसाठी १२ कोटी रुपये निधी उपलब्ध, नायगाव येथील पशुवैद्यकीय दवाखाना इमारत, बांधकाम, ट्रॉमा केअर व विस्तारित सामान्य रुग्णालय इमारत यासाठी रुपये २७ कोटी निधी उपलब्ध केला. त्यांनी उमरी व धर्माबाद या शहरांतर्गत सुमारे दहा कोटी वाढीव निधी मिळवला अर्थात सन २०१४ ते २०१८ या काळात ती विकासकामे पूर्णत्वास आली सन २०१५-२०१६ मध्ये निमटेक बंधाऱ्यातंर्गत उमरी तालुक्यातील काही गावातील संपादित जमिनीचा मोबदला रुपये पाच कोटी संबंधित लाभार्थ्यांना तसेच २०१७-२०१८ मध्ये बाभळी बंधाराअंतर्गत बरबडा व अन्य गावांतील लाभार्थिंना शेतीजमिनीचा मोबदला मिळावा म्हणून आमदार वसंतराव यांनी जे प्रयत्न केले ते फलदायी झाले.

सन २००९ ते २०१४ या कालावधीतील पंचवार्षिक योजना विकास निधी आराखडा त्याअंतर्गत नायगाव तालुक्यातील पाणीपुरवठा ग्रामविकासअंतर्गत रस्ते, दलित वस्ती, जिल्हा वार्षिक योजना इत्यादींसाठी ७० कोटी ९३ लाख रुपये. त्याच कामासाठी उमरी तालुक्याला ३३ कोटी ४२ लाख तर धर्माबाद तालुक्यातील त्याच कामासाठी २३ कोटींचा निधी मेजूर केला गेला. अर्थात, ती कामे पूर्णत्वास आली. उमरी-धर्माबाद तालुक्यात सन २००९ ते २०१४ पर्यंत ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प भूसंपादन मोबदला अंतर्गत कालवे सिमेंटीकरण व वितरिकेसाठी मंजूर निधी रुपये ११२ कोटी, नायगाव तालुक्यातील कोलंबी लिफ्ट इरिगेशन उपसा जलसिंचन अंतर्गत २३ गावांसाठी रुपये ११२ कोटीचा निधी, संपूर्ण नायगाव मतदारसंघातील अर्थात उमरी व धर्मावाद नैसर्गिक आपत्ती योजनेअंतर्गत

२७ कोटी तेरा लाख मुख्यमंत्री अर्थसाह्य निधीतून, वैद्यकीय उपचार व उपजीविकेसाठी २७ कोटी २७ लाखांचा निधी मिळवून देण्यात वसंतराव चव्हाण यांचा सक्रिय सहभाग लाभला.

एकंदरीत नायगाव कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत मांजरम येथे पेट्रोलपंप तर नायगाव येथे गोदाम बांधकाम तसेच मतदारसंघातील सार्वजनिक दिव्यांना दहा लाख रुपये निधी वाटप केला. बिलोली तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष म्हणून सौ. सुंदरताई वसंतराव चव्हाण यांची बिलोली पंचायत समिती महिला सभापतिपदी निवड होण्यासाठी वसंतरावांनी योगदान दिले. रोजगार हमी योजना सदस्य म्हणून वसंतराव चव्हाण यांनी पश्चिम बंगाल व अन्य राज्यांचा अभ्यासदौरा केला. नायगाव तालुका निर्मितीसाठी त्यांनी १९९२ साली प्रयत्न केले. एकंदरीत नायगाव तालुक्याच्या निर्मितीत आणि विकासामध्ये बळवंतराव चव्हाण व वसंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा आहे.

**सारांश**

वसंतराव चव्हाण यांची राजकीय जडणघडण ही नायगांव नगरीचे सरपंच जिल्हा परिषद सदस्य, विद्यापीठ सदस्य, जिल्हा बँक चेरमण, आमदार आणि खासदार इत्यादी पदावर त्यांची निवड झाली होती. त्यांच्या राजकीय जडणघडणीमध्ये कौटुंबिक पार्श्वभूमी, राजकीय वारसा त्याच बरोबर विविध राजकीय नेतृत्वाचा त्यांच्यावर प्रभाव पडलेला दिसून येतो.

**संदर्भ**

१. नरेंद्र थोरी, २००३, नेतृत्व, सरकार एवं भारतीय राजनीति, आर.सी.एस. प्रकाशक, जयपूर
२. एन.जयापालन, २००२, ग्रामीण समाजशास्त्र, अटलांटिक प्रकाशक आणि वितरक, नवी दिल्ली,
३. चव्हाण परिवारांची वंशावळ, वसंतगाथा,
४. हणमंतराव बळवंतराव चव्हाण, वसंतगाथा, कौटुंबिक एकोप्याचा दीपस्तंभ,
५. लता सतीश पाटील, वसंतगाथा, वादळातील नंदादीप माझे बाबा,
६. प्रणिता आनंदराव पाटील, वसंतगाथा, आमचे आधारस्तंभ
७. श्रीमती सुंदरताई चव्हाण, वसंतगाथा, सहजीवनातल्या आठवणी म्हणजे जीवनाच्या सावल्या, साईनाथ मनोहर गायकवाड, वसंतगाथा, जडणघडण,
८. दत्ता मारोती येवते, वसंतगाथा, दैवबलम् पुत्राचा यशस्वी राजकीय प्रवास,
९. शिवा कांबळे, वसंतगाथा, प्रवाराजकारणाला समाजकारणाची जोड,
१०. उद्धव भोसले, वसंतगाथा, शिक्षणवृत्ती नेतृत्वाचा दीपस्तंभ